# चोरी

| | | |
|---|---|---|
| १ | ३७९ (उघडयावरील चोरी) | १.जंगम मालमत्तेची चोरी<br>२. ती ( जंगम मालमत्ता ) एखादया इसमाच्या ताब्यात होती<br>३.आरोपीने सदर जंगम मालमत्ता त्या इसमाच्या ताब्यातुन हलविली असेल<br>४.ताबेदाराच्या संमतीशिवाय ती (जंगम मालमत्ता) हलविणे / हलविण्याच्या हेतु असल्यास. |
| २. | ३८० ( उघडया घरातुन चोरी) | बंदिस्त जागेतुन किंवा रहाणेच्या जागेतुन चोरी |
| ३. | ३८१ (नोकराने केलेली चोरी) | आरोपी हा क्लार्क . नोकर किंवा कामगार होता, त्याने मालकाच्या ताब्यातील जंगम मालमत्तेची चोरी केली आहे. |
| ४. | ३८२ (चोरी करण्याकरिता जिव घेण्याची अगर दुखापत करण्याची तयारी) | चोरी करुन जातांना किंवा चोरलेला माल आपल्या ताब्यातुन न जावा या करिता कोणाचा जिव घेण्याची अगर दुखापत करण्याची. किंवा प्रतिबंधाचे भय घालण्याची तयारी करुन कोणी चोरी करील. |
| ५. | चोरीचे पुढील प्रमाणे गुन्हे घडु शकतात. | उघडया जागेवरील चोरी, घरातील / मोकळया जागेतील कोणत्याही ठिकाणची चोरी. जनावर , सायकल, मोटर सायकल,मोटर गाडया, इंजिन, इंजिन पार्ट, पिके, खिसा कापुन,मंगळसुत्र अगर सोन्याची चैन चोरी, दुकानातील चोरी,रेल्वे/बस स्थानकातील चोरी, देवळातील चोरी, कॉपर वायर चोरी, इ. वरील प्रमाणे चारीचे प्रकार होऊ शकतात.तरी ज्या त्या शिर्षकाखाली चोरी झ ााल्यास पोलीस ठाण्याकडिल रेकार्ड वरील गुन्हेगाराकडे तपास करावा.<br>मंगळसुत्र अगर चैन चोरी प्रकरणात आरोपीना फिर्यादीने ओळखले असलेस त्यांचे वर्णनावरुन रेखाचित्र तयार करुन त्याप्रमाणे तपास करावा. तसेच गुन्हयात वाहन वापरले असल्यास त्या बाबत नंबर, वर्णन इत्यादा माहिती मिळवुन तपास करावा. |

## चोरीचे गुन्हे नोंदविण्यापुर्वी व नंतर तपास करीत असताना विचारत घ्यावयाचे मुद्दे

| मुद्दा क्रं | तपास कामाची माहिती |
|---|---|
| **१.** | गुन्हाची खबर मिळताच गुन्हयाचे घटनास्थळ आहे त्या स्थितीत ठेवण्याकरिता तात्काळ I बाईक / I कार युनिट घटनास्थही रवाना करुन घटनास्थळ संरक्षित केल्याची नोंद स्टेशन डायरीला घेण्यात यावी. |
| **२.** | गुन्हा हा CCTNS कार्यप्रणालीत नोंद घेवुन खबर मध्ये संशयित इसमाचे नावं/उपनांव /वय/वर्ण/शरीरयष्टी, अंगात घातलेल्या कपडयांचे वर्णन , पायातील वाहनांचा प्रकार इ. वर्णन घ्यावे FIR ची प्रत मा.मॅजिस्टेट कडे पाठविण्यात यावी. |
| ३. | चोरीस गलेल्या मालाचे वर्णन घ्यावे |
| ४. | गुन्हा करण्यासाठी आरोपीने कोणता बहाणा केला होता याची माहिती घ्यावी. |
| ५. | फिर्यादी अगर साक्षदारांकडुन आरोपीचे वर्णन , पेहराव,विशिष्ट खुना, भाषा इ. माहिती करुन घ्यावी |
| ६. | पिक चोरी संदर्भात माहिती घेतांना फिर्यादीने शेतात, वस्तीजवळ भटक्या टोळया आले-गेल्याची माहिती गोळा करावी. |
| ७ | पिक चोरी होण्यापुर्वी पिकासंदर्भात कोणी अनोळखी इंसमानी पिकाच्या राखणीबाबत चौकशी केली होती का? याची छाननी करावी. |
| ८. | शेतात / चोरीच्या ठिकाणी गुन्हे गारांचे पावलांचे ठसे उमटले आहेत का, गाडीच्या चाकाची निशान आहेत का? याबाबत खात्री करावी. |
| ९. | सदर गुन्हयाचा कोणी प्रत्याक्षदर्शी साक्षीदार आहे काय ? याची माहिती घेवुन त्याचे व्हिडीओ चित्रण करण्यात यावे. |
| १०. | फिर्यादीचे घरी गुन्हयाचे वेळी ईतर साक्षीदार निष्पन झाल्यास सदर वेळी ते काय करत होते याची माहिती घ्यावी. |
| ११. | घटनास्थळाचा जवळपास आठवडा बाजार केव्हा व कोठे भरतो या बाबतची माहिती मिळवावी. |
| १२. | पंचनामा करताना आवश्याकता असेल तर दुभाषी वापरण्यात यावा व पंच म्हणुन सराईत पंच घेऊ नये. |
| १३. | फिर्यादीची फिर्याद घेतांना जरुर भासल्यास दुभाषी वापरण्यात यावा . |
| १४. | घटनास्थळी इतर कोणी व्यक्ती येवुन घटनास्थळाच्या वस्तु हाताळल्या होत्या काय? याची खात्री करावी. |
| १५. | घटनास्थळ निरीक्षण करताना पंचासह घडयाळयाच्या काठयाच्या दिशेनेअथवा उलटया दिशेने तपशीलवार पचनामा करण्यात यावा. |
| १६. | पंचनामा रात्री करण्यात आला असल्यास कशाच्या प्रकाशात करण्यात आला याचा उल्लेख पंचनामा करण्यात यावा. |
| १७. | गुन्हयाच्या अनुषंगाने डॉग स्कॉड , फिगंर प्रिंट एक्सपर्ट यांना प्राचारण करणेत यावी |
| १८. | कॉपर वायर अगर देवळातील चोरी संदर्भात माहिती वरिष्टांना कळवावी. |
| १९. | पंचनामा / जबाब वाचुन दाखवुन स्वाक्षरी घेण्यात यावी. |
| २०. | जखमीच्या जखमाबाबत डॉक्टरांशी चर्चा करुन जखमा कोणत्या हत्याराने |

| | |
|---|---|
| | झाल्या असव्यात याबाबत चौकशी करावी. |
| २१. | जखमीच्या जखमाबाबत डॉक्टारांकडुन सर्टीफिकेट  घेण्यात यावे. |
| २२. | कॉपर वायर चोरीच्या संदर्भात शेजारील जिल्हे  व राज्यात बिनतारी संदेश करुन ईमेल व्दारे तपास यादया पाठवुन गेलेला माल व अज्ञात आरोपीचा शोध घेण्यात यावा. |
| २३. | मंदिरातील चोरी सारख्या गुन्हयात अशा प्रकारे गुन्हे करणा-या आरोपीच्या हालचालीवर पाळत ठेवण्यात यावी. |
| २४. | मंदिर चोरी प्रकरणात मुर्ती चोरीस गेली असेल तर त्या मुर्तीचा फोटो प्रसिध्द करण्यात यावा |
| २५. | ट्रान्सपोर्ट कंपनी , एस टी स्टँड , रेल्वे स्टेशन येथे अशा चोरी बाबत खबर पोस्ट लावण्यात यावे. |
| २६. | गुन्हा घडले ठिकाणची जवळपासच्या भागात वेषांतर करुन कोणी नवीन गुन्हेगार राहत आहे का? याबाबत तपास करावा. |
| २७. | चोरीचा गुन्हा दाखल होताच एम ओ बी व संगणक शाखेत ताबडतोब माहिती पाठविण्यात यावी |
| २८. | घटनास्थळाचा डम्प डाटा हस्तगत करुन संशयीत मोबाईलचा सीडीआर व एसडीआर प्राप्त करुन घेवुन बारकाईने तपास करावा. |
| २९. | पोलीस स्टेशनला उपलब्ध असणा-या रेकार्डवरुन अशा प्रकारचे गुन्हे करणा-या गुन्हेगाराचा तपशील घेण्यात येवुन आरोपीच्या हालचालीची माहीती  मिळवावी . |
| ३०. | चोरीस गेलेल्या मालाबाबत ताबडतोब स्थानिक व जवळपासच्या पोलीस स्टेशनला कळविण्यात यावे. |
| ३१. | सराफकठठा , जुना भंगार  गहाणवटी, व्यवहार करणारे , मोटार वर्कशॉप , सायकलीची दुकाने , इंजिन पार्ट दुरुस्ती वगैरे ठिकाणी अगर त्याचे व्यवहार करणारे यांचेकडे चौकशी करणेत यावी. |
| ३२. | नुकताच तुरुंगातुन अशा प्रकारे गुन्हे करणारा सुटला आहे काय साची कोर्टातुन खात्री करावी. |
| ३३. | फिर्यादीचे कोणाशी वैर असेल कारणावरुन चोरी झाली असेल का याबाबत चौकशी करावी |
| ३४. | गावातील अगर आजुबाजुचे गावातील यात्रा, ऊरुस, बाजारामध्ये यापुर्वी विशीष्ट प्रकारचे गुन्हे होतात काय याबाबत चौकशी करण्यात यावी. |
| ३५. | अटक आरोपी हा गुन्हयातील माल काढुन देत असेल तर तो भारतीय पुरावा कायदा कलम २७ प्रमाणे निवेदन पंचनामा करुन माब्यात घेण्यात यावा व जप्त केलेल्या प्रत्येक वस्तु ही एकत्रीत सिल न मारता वेगवेगळी सिल बंद करण्यात यावी. |
| ३६. | जप्त वस्तु कोण्त्या ठिकाणाहुन जप्त करण्यात आल्या हे तपशीलवार सुसंगत पणे पंचनम्यात लिहीण्यात आले असल्याची खात्री करावी. |
| ३७. | गुन्हयातील साक्षीदार व पंचाचे पुर्ण पत्ते, पुर्ण नावं, मोबाईल नंबर घेण्यात यावे. |
| ३८. | फिर्यादी व साक्षीदार यांने गुन्हेगारांना गुन्हा करताना पाहिले असल्यास त्यांची ओळख परेड घ्यावी. |
| ३९. | सदर गुन्हयात CCTNS  कार्यप्रणालीत फॉर्म नं १ ते ५ वेळच्या वेळी भरुन केसडायरी भरण्यात यावी. |
| ४०. | अटक आरोपी विरुध्द भरपुर पुरावा उपलब्ध झाल्यास दोषारोप दाखल करण्यात यावे. |

## • घरफोडीचे गुन्हे नोंदविण्यापुर्वी व नंतर तपास करीत असतांना विचारात घ्यावयाचे मुदद्े

| मुदद्ा क्र | तपास कामाची माहिती |
|---|---|
| १ | गुन्हयाची खबर मिळताच गुन्हयाचे घटनास्थळ आहे त्या स्थितीत ठेवण्याकरिता तात्काळ । बाईक/कार युनिट यांना घटनास्थळी रवाना करून घटनास्थळ सुरक्षित केल्याची नोंद स्टेशन डायरीला घेण्यात यावी. |
| २ | गुन्हयाची फिर्याद घेताना गुन्हा कोणत्या तारखेस वेळी व ठिकाणी व कोणत्या पध्दतीने केला बाबत फिर्यादीत नमुद करावे. तसेच गुन्हयाच्या ठिकाणी येण्यासाठी गुन्हेगाराने कोणता बहाणा केला या बाबतची माहिती घ्यावी. |
| ३ | गुन्हा cctns कार्यप्रणालीस नोंद घेवुन फिर्यादीवर स्वाक्षरी घेवुन त्याची एक प्रत फिर्यादीस व एक प्रत मा.मॅजिस्टेट यांचेकडे तात्काळ पाठविण्यात यावी. |
| ४ | Investigation plan of action बाबतचा तक्ता तयार करून घ्यावा. |
| ५ | गुन्हयात चोरी गेलेल्या मालाचे सविस्तर वर्णन घ्यावे. घटनास्थळी गुन्हेगारांने हाताळलेल्या वस्तु मिळुन येतात का ? याची तपासणी करावी घटनास्थळाचे फोटो व व्हिडोओ चित्रण करून घ्यावे. |
| ६ | फिर्यादी अगर साक्षीदाराकडुन आरोपीचे वर्णन,पेहराव, विशिष्ट खुना, भाषा इ. माहिती करून घेवुन त्याचे व्हिडीओ चित्रीकरण करून त्याचे तपास टिपण नोंदवावेत. |
| ७ | गुन्हेगाराच्या काही वस्तू गुन्हयाच्या ठिकाणी मिळुन आल्यास त्या जप्त कराव्यात. |
| ८ | गुन्हेगाराने गुन्हयाच्या ठिकाणी विशेष काही कृत्य केलेची खात्री करावी. |
| ९ | मालकी हक्क व ओळखण्याच्या खुणा मिळवाव्यात. |
| १० | गुन्हयात प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत का ? याबाबतची खात्री करावी. |
| ११ | गुन्हा घडला त्या ठिकाणीचे दरवाजे खिडक्या व दिवे केव्हा बंद केले होते ? याबाबतची माहिती घ्यावी. |
| १२ | प्रकाशासाठी घरात दिवा ठेवला होता काय ? याबाबतची माहिती घ्यावी. |
| १३ | घटनास्थळाचे निरीक्षण करतांना पंचासह घडयाळयाच्या काटयाच्या दिशेने अथवा उलटया दिशेने तपशीलवार पंचनामा करण्यात यावा. |
| १४ | पंचनामा करतांना दुभाषी वापरण्यात यावा व पंचाना पंचनामा/जबाब वाचुन दाखवुन स्वाक्षरी घेण्यात यावी. |
| १५ | पंचनामा कशाच्या प्रकाशात करण्यातआला याचा उल्लेख पंचनाम्यात करण्यात यावा. |
| १६ | गुन्हयाच्या अनुषंगाने डॉग स्कॉड,फिंगर प्रिन्ट एक्सपर्ट यांना पाचारण करणेत यावे. |
| १७ | फिर्यादी अगर इतर शेजारी राहणारे यांचा नोकर,घरगडी अचानक नोकरी सोडुन गेला आहे काय ? याची खात्री करावी. |
| १८ | गुन्हेगाराने खाण्यासाठी काही पेय/पदार्थ दिले होता का ? याची खात्री करावी. |
| १९ | घडलेल्या गुन्हयाबाबत एम ओ बी काढुन सजेशन घेण्यात यावे. |
| २० | गुन्हयाची माहिती जिल्हा गुन्हे कार्यप्रणाली व संगणक शाखेस पाठवावी. |

| | |
|---|---|
| २१ | जखमीच्या जखमांबाबत डॉक्टरांशी चर्चा करून जखमा कोणत्या प्रकारच्या हत्याराने झाल्या असाव्यात याबाबत चौकशी करावी. |
| २२ | स्थानीक व जवळपासचे पोलीस ठाणेस चोरीस गेले मालाचे वर्णन ताबडतोब कळवावे. |
| २३ | स्थानीक बातमीदारांना भेटुन गुन्हया संदर्भाने माहिती देवुन गुन्हयासंदर्भात माहिती मिळवणेस सांगावे. |
| २४ | रेल्वे स्टेशन,बस स्थानक,दारूचे गुप्ते,लॉजिंग बोर्डींग,वेश्यावस्ती,जुगार अड्डे, पानपट्ट्, दुकाणे व इतर करमणुकीच्या ठिकाणी गुन्हेगारांचा शोध झोण्यात यावा. |
| २५ | सराफ कटट्ा,गहाण घाणवट व्यवहार करणारे,चोरीचा माल घेणारे यांचेवर लक्ष ठेवण्यात यावे. |
| २६ | अटक असलेल्या आरोपीकडे गुन्हयाबाबत कसुन चौकशी करण्यात यावी. |
| २७ | भटक्या टोळया उतरल्या आहेत काय याचा शोध घेण्यात यावा. |
| २८ | आठवडा बाजार असल्यास त्या बाजारात नवखे कोणी आले असल्यास त्या अनुषंगाने तपास करण्यात यावा. |
| २९ | घटनास्थळाचा डम्प डाटा हस्तगत करून संशयीत मोबाईलचा सीडीआर व एसडीआर प्राप्त करून घेवुन बारकाईने तपास करावा. |
| ३० | घरगडी असल्याचे त्याच्या वर्तनाची व संगतीची चौकशी करण्यात यावी. |
| ३१ | गुन्हे कार्यप्रणाली व गणकयंत्र शाखेकडुन अशा प्रकारे गुन्हे करणारे संशयीतांची नावे आली असतील तर त्याच्या हालचालींवर फरक पडला असेल तर त्याच्या दृष्टीने तपास करण्यात यावा. |
| ३२ | सराफकटट्ा,जुनाभंगार,गहाणवटी,व्यवहार करणारे,मोटार वर्कशॉप,सायकलीची दुकान,इंजिन पार्ट दुरूस्ती वगैरे ठिकाणी अगर त्याचा व्यवहार करणारे यांचेकडे चौकशी करण्यात यावी. |
| ३३ | नुकताच तुरूंगातून अशा प्रकारे गुन्हे करणारा गुन्हेगार सुटला आहे काय याची कोर्टातुन खात्री करावी. |
| ३४ | गावातील अगर आजुबाजूचे गावातील यात्रा,उरूस,बाजारामध्ये यापुर्वी विशिष्ट प्रकारचे गुन्हे होतात काय याबाबत चौकशी करण्यात यावी. |
| ३५ | अटक आरोपी हा गुन्हयातील माल काढुन देत असेल तर तो भारतीय पुरावा कायदा कलम २७ प्रमाणे निवेदन पंचनामा करून जप्त करून ताब्यात घेण्यात यावा व जप्त केलेल्या प्रत्येक वस्तु ही एकत्रीत सिल न करता वेगवेगळी सिल बंद करण्यात यावी. |
| ३६ | जप्त वस्तु या कोणत्या ठिकाणाहुन जप्त करण्यात आल्या हे तपशीलवार, सुसंगतपणे पंचनाम्यात लिहीण्यात आले असल्याची खात्री करावी. |
| ३७ | गुन्हयातील माल आरोपीकडुन काढुन घेत असतांना आरोपीतांचे पंचासमक्ष निवेदन नोंदवुन पंचनामा करून निवेदन पंचनाम्यावर आरोपीची स्वाक्षरी घ्यावी. |
| ३८ | गुन्हयातीलसाक्षीदार व पंचांचे पुर्ण पत्ते,पुर्ण नाव,मोबाईल नंबर घेण्यात यावे. |
| ३९ | घरझडतीत गुन्हयातील चोरीस गेलेला माल मिळाला तर तो मर्यादित साक्षीदारास दाखवुन ओळखल्याबदद्ल पंचनामा करून जप्त करण्यात यावा. |
| ४० | गुन्हयात मिळालेल्या पुराव्याची छानननी करून शासकीय अभीयोक्ता यांचे कडुन पडताळणी करून घ्यावी व आरोपी यापुर्वी शिक्षा झाली असल्यास भादवि कलम |

| | |
|---|---|
| | ७५ लावण्यात यावे. |
| ४१ | सदर गुन्हयात cctns कार्यप्रणालीत फॉर्म नं १ ते ५ वेळच्या वेळी भरून केसडायरी नोंदवावी. |
| ४२ | अटक आरोपी विरूध्द भरपुर पुरावा उपलब्ध झालेस दोषारोप दाखल करण्यात यावा. |

# • दुखापत •

| | | |
|---|---|---|
| १ | ३२३<br>(साधी दुखापत) | १.तक्रारदाराच्या शरीरास वेदना अगर विकार होईल अशी कृती केली पाहिजे.<br>२.सदरची दुखापत होण्यासाठी किंवा आपल्या कृतीने तसे होणार आहे हे माहिती असुन सुध्दा तशी कृती केली तर |
| २ | ३२४<br>( घातक शस्त्राचे सहाय्याने साधी दुखापत ) | १.तक्रारदाराच्या शरीरास वेदना हाईल अगर विकार होईल अशी कृती केली पाहिजे.<br>२.ती कृती त्या ईरादयाने केलेली असाव.किंवा या कृतीतुन कोणच्या शरीरास वेदना रोग अगर विकार हाईल हे माहित असावे.<br>३.सदरची कृती सिस्फोटाच्या सहाय्याने अगर भोकसण्याचे अगर कापण्याचे हत्याराने किंवा ज्याचा वापर हत्यारासारखा केला असता मृत्यु येण्यासारखे किंवा विष अगर तत्सम पदार्थ किंवा असा पदार्थ की जो माण्सांच्या शरीरात गेला असता अगर रक्तात गेला असता अपाय होतो अगर कोण्त्याही प्राण्याव्दारे करणे. |
| ३ | ३२५<br>(मोठी दुखापत) | १.आरोपीने दुखापत केलेली असावी .<br>२.ती दुखापत कलम ३२४ मध्ये सांगितल्याप्रमाणे मोठी असावी.<br>३.सदरची दुखापत आपखुशीने कलम ३९ मध्ये सांगितल्याप्रमाणे असावी. |
| ४ | ३२६<br>(घातक हत्याराच्या सहाय्याने दुखापत) | १.आरोपीने मोठी दुखापत आपखुशीने केलेली असावी .<br>२.ती दुखापत विस्फोटच्या सहाय्याने अगर भोसकण्याच्या अगर कापण्याच्या हात्याराने विष अगर तत्सम पदार्थ किंवा असा पदार्थ की जो माणसाच्या शरीरात गेला असता अगर रक्तात गेला असता अपाय होतो अगर कोणत्याही प्राण्याव्दारे करणे. |
| ५ | ३३२<br>(आपखुशीने सरकारी नोकरास दुखापत करणे ) | १.आरोपीने सरकारी नोकरास आपखुशीने दुखापत केलेली असावी<br>२.दुखापत केलेली असावी .<br>अ) सरकारी नोकर त्याचे कायदेशीर कर्तव्य बजावत असतांना<br>ब) त्यास त्याचे कर्तव्य करताना प्रतिबंध व्हावा.<br>क) त्याने कायदेशीर कर्तव्य करण्याचा प्रयत्न केला असावा. |
| ६ | ३३३<br>(आपखुशीने सरकारी नोकरास मोठी दुखापत ) | १.आरोपीने सरकारी नोकरास आपखुशीने दुखापत केलेली असावी.<br>२.सरकारी नोकर त्याचे कायदेशीर कृत्य करीत असतांना<br>३.मोठी दुखापत केलेली असावी .<br>अ) जेव्हा तो सरकारी नोकर म्हणुन कर्तव्य करीत असताना<br>ब) सरकारी नोकर म्हणुन काम करीत असताना त्यास प्रतिबंध करणेसाठी<br>क) सरकारी नोकर या नात्याने कोणतेही कार्य करित असताना |

• दुखापतीचे गुन्हे नोंदविण्यापुर्वी व नंतर तपास करीत असतांना विचारात घ्यावयाचे मुदद्

| मुदद्ा क्र | तपास कामाची माहिती |
|---|---|
| १ | गुन्हयाची खबर मिळताच गुन्हयाचे घटनास्थळ आहे त्या स्थितीत ठेवण्याकरिता तात्काळ ा बाईक/कार युनिट यांना घटनास्थळी रवाना करून घटनास्थळ सुरक्षित केल्याची नोंद स्टेशन डायरीला घेण्यात यावी. |
| २ | दुखापत होईल या इरादाने कृत्य केले असल्याची खात्री करण्यात यावी. |
| ३ | दुखापती बाबत सविस्तर व मुदद्सुद फिर्याद घेण्यात यावी. |
| ४ | घातक शस्त्राने दुखापत करण्यात आल्याची खात्री करावी |
| ५ | आरोपीचे नाव माहित असलेस नाव फिर्याद जबाब मध्ये घेण्यात यावे. |
| ६ | गुन्हा कोठे व कसा घडला,गुन्हयात कोणते हत्यार वापरले याचा उल्लेख असावा. |
| ७ | गुन्हयाची फिर्याद हि समक्ष हजर,फोनव्दारे,ई—मेलव्दारे,जखमी/नातेवाईकांनी दिली आहे याबाबतची माहिती घ्यावी. |
| ८ | गुन्हयाची cctns कार्यप्रणालीस नोंद घेवुन त्याची एक प्रत फिर्यादीस व एक प्रत मा.मॅजिस्टेट यांचेकडे पाठविण्यात यावी. |
| ९ | फिर्यादीची फिर्याद घेताना आवश्यकतेनुसार दुभाषी वापरण्यात यावा व फिर्याद वाचुन दाखवुन त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी. |
| १० | घटनास्थळाचे व्हिडोओ चित्रीकरण करून फोटो काढण्यात यावेत. |
| ११ | पंचनामा करतांना गरज असल्यास दुभाषी वापरण्यात यावी. |
| १२ | घटनास्थळाचे निरीक्षण करतांना पंचासह घडयाळयाच्या काटयाच्या दिशेने अथवा उलटया दिशेने तपशीलवार पंचनामा करण्यात यावा. |
| १३ | फिर्यादी जखमी असल्यास ज्य पोलीस शिपाई सोबत पाठविण्यात आले त्याची नोंद घ्यावी. |
| १४ | जखमी परस्पर औषधोपचारासाठी दाखल झाला असल्यास मेडीकल ऑफिसर यांना कळवावे. |
| १५ | मेडीकल ऑफिसर यांना कळविले बाबत स्टेशन डायरीत नोंद करून मदतीसाठी अंमलदार यांना आदेश दयावा. |
| १६ | आदेश दिल्यानंतर त्याची खबर घेवुन आले बाबत रिपोर्ट दयावा. |
| १७ | रिपोर्ट बाबत वर्दी आली असल्यास दाखल करून तशी स्टेशन डायरीत नोंद करण्यात यावी. |
| १८ | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांचे जबाबाचे व्हिडीओ चित्रीकरण करून त्याचे सीआरपीसी कलम १६८ प्रमाणे जबाब नोंदविण्यात यावे. |
| १९ | पंचांचे व साक्षीदारांचे पुर्ण पत्ते,पुर्ण नाव,फोन नंबर घेण्यात यावे. |
| २० | जखमीच्या अंगावरील कपडे जप्त करण्यात यावे. |
| २१ | जखमीच्या अंगावरील कपडयांवरून धारदार शस्त्राने जखम झाली अगर कसे या बाबत सविस्तर पंचनामा करण्यात यावा. |
| २२ | जखमीचे वैदयकिय प्रमाणपत्र मागवुन घेण्यात यावे. |
| २३ | त्यात जखमाचे स्वरूप गंभीर आहेत काय याची खात्री करावी. |
| २४ | मोठी दुखापत झाली असल्यास वैदयकीय अधिकारी यांचेकडुन खुलासा करून |

| | |
|---|---|
| | घेण्यात यावा. |
| २५ | जखमीच्या घरच्या कारणावरून सदरचा गुन्हा घडला आहे का ?याबाबतचे पुरावे मिळवावेत. |
| २६ | अशा कारणाने गुन्हा घडला असल्यास त्यात पुर्वीचे अर्ज तक्रारी होत्या का? याची खात्री करावी. |
| २७ | प्रर्वीच्या तक्रारी असल्यास त्याचे उतारे कागदपत्रात सामील करावे. |
| २८ | गुन्हयापुर्वी प्रतिबंध कार्यवाही करण्यात आली असल्यास ते पुरावे हस्तगत करावे. |
| २९ | पुर्वी प्रतिबंध कार्यवाही करण्यात आली असल्यास जामीन बॉन्ड रदद् करणेस रिपोर्ट पाठविण्यात यावा. |
| ३० | अटक आरोपी हा गुन्हयातील माल काढुन देत असेल तर तो भारतीय पुरावा कायदा कलम २७ प्रमाणे निवेदन पंचनामा करून जप्त करून ताब्यात घेण्यात यावा |
| ३१ | निवेदन पंचनाम्यात जप्त केलेल्या प्रत्येक वस्तु ही एकत्रीत सिल न करता वेगवेगळी सिल बंद करण्यात यावी. |
| ३२ | जप्त वस्तु या कोणत्या ठिकाणाहुन जप्त करण्यात आल्या हे तपशीलवार, सुसंगतपणे पंचनाम्यात लिहीण्यात आले असल्याची खात्री करावी. |
| ३३ | गुन्हयात मिळालेल्या पुराव्याची छाननी करून शासकीय अभीयोक्ता यांचे कडुन पडताळणी करून घ्यावी |
| ३४ | सदर गुन्हयाची फाईल उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेकडुन पडताळणी करून तपासात निष्पन्न झाले प्रमाणे कार्यवाही करावी. |
| ३५ | सदर गुन्हयात cctns कार्यप्रणालीत फॉर्म नं १ ते ५ वेळच्या वेळी भरून केसडायरी नोंदवावी. |
| ३६ | अटक आरोपी विरूध्द भरपुर पुरावा उपलब्ध झालेस दोषारोप दाखल करण्यात यावा. |

• **मोटार अपघात नोंदविण्यापुर्वी व नंतर तपास करीत असतांना विचारात घ्यावयाचे मुद्दे**

| मुदद्‌ा क्र | तपास कामाची माहिती | शेरा |
|---|---|---|
| १ | गुन्हयाची खबर मिळताच गुन्हयाचे घटनास्थळ आहे त्या स्थितीत ठेवण्याकरिता तात्काळ I बाईक/कार युनिट यांना घटनास्थळी रवाना करून घटनास्थळ सुरक्षित केल्याची नोंद स्टेशन डायरीला घेण्यात यावी. | |
| २ | अपघाताची खबर टेलीफोनव्दारे आली असल्यास त्या प्रमाणे सविस्तर नोंद घेण्यात यावी. | |
| ३ | अपघाताची खबर मोटार चालकाने,जखमीने दिलेली असल्यास त्याप्रमाणे सविस्तर नोंदी घ्याव्यात. | |
| ४ | अपघाताची खबर cctns कार्यप्रणालीस नोंद घेवुन त्याची एक प्रत फिर्यादीस व एक प्रत मा.कोर्टात पाठविण्यात यावी. | |
| ५ | Investigation plan of action बाबतचा तक्ता तयार करून घ्यावा. | |
| ६ | तपासीक अंमलदार घटनास्थळी जाणेपुर्वी वैदयकीय अधिकारी यांना माहिती दयावी | |
| ७ | मोटार अपघातामध्ये २ किंवा त्यापेक्षा अधिक मयत असतील तर जलद खासवर्दी अहवाल पाठवावा. | |
| ८ | अपघाताच्या ठिकाणाचा नकाशा काढुन घेवुन घटनास्थळाचे फोटो काढावेत. | |
| ९ | अपघातामधील जखमींना औषधोपचाराकरिता तात्काळ पाठविण्यात यावे. | |
| १० | अपघातातील वहाने,जखमी,मयत यांना रस्त्यावरून दुर करून वाहतुक सुरळीत करावी. | |
| ११ | अपघाताच्या ठिकाणी वाहनांच्या रस्त्यावरील खुना सुरक्षिततेच्या दृष्टीने राखुन ठेवाव्यात. | |
| १२ | अपघातामध्ये जर मयत असेल तर प्रताचा इनक्वेष्ट पंचनामा करून प्रेत पोस्टमार्टमसाठी पोलीसांचे मार्फत सरकारी दवाखान्यात पाठवावे. | |
| १३ | मयतास मरण त्यामुळे आले त्याचा अभिप्राय घ्यावा. | |
| १४ | मयताची ओळख पटत नसेल तर त्याचा फोटो,हाताचे ठसे,गांवात दवंडी,वर्तमानपत्रे,आकाशवाणी,दुरदर्शन यांचेकडे मयताबाबत माहिती दयावी. | |
| १५ | जरूरी असेल तर मयताची जिल्हा गॅझेट व महाराष्ट्र गॅझेट मध्ये प्रसिध्दी दयावी. | |
| १६ | वाहनातील व अपघातातील,घटनास्थळाचे शेजारी असे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांचे तपास टिपण घेवुन व्हिडोओ चित्रीकरण करण्यात यावे. | |
| १७ | अपघातातील वाहन व चालक यांची काळजीपुर्वक तपासणी करून घ्यावी. | |
| १८ | जरूरी असेल तर वाहन व्हेईकल इन्स्पेक्टर यांचेकडुन तपासणी करून प्रमाणपत्र घ्यावे. | |
| १९ | अपघाताच्या ठिकाणचा पंचासमक्ष पंचनामा करणेत यावा. | |
| २० | पंचनाम्यामध्ये वाहनाची दिशा,वाहनांचे कायदेशीर परवाने,वाहनांचे नंबर,ब्रंक–टायरच्या खुना, वाहनांची लांबी रूंदी, परिस्थिती यांच्या चतु:सिमा घेणेत याव्यात. | |
| २१ | वाहनाच्या दिशा,काचेचे तुकडे,वाहनाच्या चाकास मास–रक्त इत्यादी आहे अगर कसे याबाबत पंचनाम्यात सविस्तर नमुद करण्यात यावे. | |

| | | |
|---|---|---|
| २२ | वाहने जर एकमेकांवर आदळली असतील तर संबंधीत वाहनांचे रंग,छिलटे,याचे वर्णन घेणेत यावे. | |
| २३ | जखमी अगर मयत यांचे अंगावरील कपडे वाहनात अडकले असतील ते जप्त करावेत. | |
| २४ | अपघतातील सर्व बाबींचा विचार करून मोटार वाहन अधिनियमाप्रमाणे खाली तपासी अंमलदार यांनी सरकारतर्फे फिर्यादी होवुन खबर दयावी. | |
| २५ | अपघातात मिळालेली खबर,परिसराचा पंचनामा,साक्षीदारांचे जबाब तसेच आरटीओ यांचा अभिप्राय या सर्व बाबींचा विचार करून मोटार चालकाचा दोष असल्यास तपासी अंमलदाराने सरकारतर्फे फिर्यादी होवुन गुन्हा दाखल करावा. | |
| २६ | मोटार वाहन चालकास त्याचा दोष दिसुन आलेने मोवाका कलम १३१ प्रमाणे नोटीस बजवावी. | |
| २७ | नोटीस बजावले बाबत त्याची नोटीसवर सही घेवुन कागदपत्रात सामील करावे. | |
| २८ | वाहन चालकाचा मोटार वाहन चालविण्याचा परवाना ताब्यात घेवुन छाननी करावी. | |
| २९ | अपघाताबाबत खबर देणेस विलंब झाला असल्यास विलंबाचे कारण नमुद करण्यात यावे तसा संबधीताचा जबाब घेण्यात यावा. | |
| ३० | घटनास्थळावरून ा बाईक यांनी हस्तगत केलेला पुरावा ताब्यात घेवुन तसेच अपघाती वहाने ताब्यात घेवुन त्याची मोटार परिवहन विभाग यांचेकडुन तपासणी करून घ्यावी. | |
| ३१ | वाहन चालकास अटक करतांना मा.सर्वोच्च न्यायालयाच्या नियमाचे पालन करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. | |
| ३२ | मयताचे वारसास अपघताची खबर देवुन प्रेत व चिजवस्तु नातेवाईकांचे ताब्यात दयावे. | |
| ३३ | अपघतातील जखमी जर दवाखन्यात दाखल असतील तर त्याबाबत त्यांच्या कुटूंबियांना वाहनाच्या मालकास सदर आपघताची खबर देवुन वाहनातील मालाची पुढील तजवीज करणे बाबत कळविण्यात यावे. | |
| ३४ | मोटार अपघताचे वेळी व्हॉट्सप,वर्तमानपत्र,आकाशवाणी,दुरदर्शनव्दारे अपघताची खबर जाहीर करावी. | |
| ३५ | अपघतातील मृताची ओळख पटताच त्यांचे नातेवाईकांना/इतरांना ताबडतोब कळवावे. | |
| ३६ | पंच व साक्षीदाराचे पुर्ण नाव,पत्ता,मोबाईल नंबर घेण्यात यावा. | |
| ३७ | मोटार अपघतातील मृताचे व नातेवाईकांना जखमींना सत्वर आर्थिक मदत मिळण्याचे दृष्टीने झाले तपासाची कागदपत्राची नकलांचा सेट मोटार अपघात दावा प्राधीकरण यांचेकडे नि विलंब पाठविण्यात यावा. | |
| ३८ | ा बाईक ने घटनास्थळाचे आणि साक्षीदार यांचे जबाबच्या व्हिडीओ चित्रीकरणाची सी.डी/डी.व्ही.डी/पेनड्राईव्ह तयार करून हॅशव्हॅल्यु काढुन तपासीक अंमलदार यांनी हस्तगत करून कागदपत्री सामील करावे. | |
| ३९ | कागदपत्रांची छाननी करून पुराव्याचे कागदपत्रांचे अ,ब,क वर्गीकरण करून दोषारोप दाखल करावे. | |
| ४० | तपास पुर्ण झाले नंतर सरकारी अभियोक्ता यांचेकडुन फाईल पडताळणी करून घेण्यात यावी. | |

| | | |
|---|---|---|
| ४१ | अभिप्राय प्रमाणे पुढील तपास पुर्ण करून उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेकडुन कागदपत्राची पडताळणी करून घेवुन त्यांचा अभिप्राय घेण्यात यावा. | |
| ४२ | सदर गुन्हयात cctns कार्यप्रणालीत फॉर्म नं १ ते ५ वेळच्या वेळी भरून केसडायरी भरून मुदतीत दोषारोप पत्र मुदद्‍्मालासह मुदतीत दोषारापपत्र सादर करण्यात यावे. | |